# ‘काळया पाण्या’चे बदलते रंग

मे महिना. मुंबईतला असहय उकाडा. मुलांची सुटी संपायला काही आठवडेच उरलेले. कुठंतरी सहलीला जायचा बेत ठरू लागला. पंचवीस वर्षांपूर्वी मित्राबरोबर अंदमानला जाऊन आलो होतो. तिथल्या कथा अनेकवार ऐकल्या असल्यानं मुलांनी तिथंच जायचा आग्रह धरला. त्याकाळी ‘कुठं काळया पाण्यावर जाताय?’ हया शब्दांतच अनेकांनी हिणवलं होतं. आणी अनुभवपण काहीसा तसाच आला होता. तिकिटं मिळवण्यासाठी केलेली वणवण, जातानाचा पाच दिवसांचा बोटीचा प्रवास, पर्यटकांसाठी फारच तुटपुंज्या सुविधा हे सगळं आठवून मला काही फारसा उत्साह नव्हता. पण मुलांनीच इंटरनेटच्या माध्यमातून सगळी माहिती काढली. एका आठवडयाचा अगदी तपशीलवार कार्यक्रमच समोर ठेवला. मग ‘हवामाना’वर भरोसा ठेवून पुन्हा एकदा काळया पाण्याच्या भेटीला जायचं नक्की केलं.



अंदमान द्वीपसमूह हा केंद्रशासित प्रदेश. त्याची राजधानी पोर्ट ब्लेयर. तिथल्या ‘वीर सावरकर’ आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचलो तेव्हा कडक ऊन पडलं होतं. पुढचे पाच सहा दिवस ऊन पावसाचा पाठशिवणीचा खेळ चालू होता त्यामुळं योजलेलं सगळं काही नीटपणे पाहता आलं. प्रत्येक ठिकाणी पंचवीस वर्षांपूर्वीच्या आठवणी व प्रतिमा सारख्या मनात दाटून येत होत्या. त्यावेळी सरकारी, खाजगी व बँक कर्मचारी नाईलाजानं शिक्षा समजूनच येत असत. मद्रास (आता चेन्नई) व कलकत्ता इथून पंधरा दिवसांनी एक जहाज येत असे. ईंडियन एअर लाइन्सचं विमान आठवडयातून फक्त दोनदा. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था यथातथाच. आता मात्र सरकारी व खाजगी विमानांच्या रोज अनेक खेपा. विमानतळाच्या बाहेर सुमो, ओम्नी व अनेक खाजगी गाडयांच्या रांगा पर्यटकांच्या सेवेला हजर. वीस पंचवीस वर्षांची चुणचुणीत व हसतमुख अशी तरूण मुलं पॅकेज टूर वर घेऊन जायला सज्ज. एकूण पर्यटन व्यवसाय तेजीत.






अंदमान-निकोबार बेटांचा समूह चेन्नईपासून व कोलकत्यापासून बाराशे कि. मी. अंतरावर दूरवर खोल समुद्रात आहे. फार पूर्वी ब्रम्हदेशापासून पर्वतांची भलीमोठी चिंचोळी रांग सागरात पार सुमात्रा बेटांपर्यंत पसरलेली होती. पाऊस, चक्रीवादळं व सततच्या भूकंपांमुळं बराचसा भाग पाण्यात बुडाला. आज सुमारे तीनशे कि. मी. लांब व दीडशे कि. मी. रूंद चौकोनात तीनशेहून अधिक बेटं विखुरलेली आहेत. अंदमान हे नाव ‘हंडुमान’ हया शब्दाचा अपभ्रंश आहे. राम-रावण युद्धात लक्ष्मण बेशुद्ध झाले असताना काही विशिष्ट वनस्पतींच्या शोधात रामभक्त हनुमान इथं येऊन गेले होते व त्याच्यावरून हया बेटांना हनुमान नाव मिळालं अशीपण एक

आख्यायिका इथं प्रचलित आहे. सतराव्या शतकात ही बेटं मराठयांच्या ताब्यात होती. मराठयांच्या नाविक दलानं अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ब्रिटिश व पोर्तु गीजांची आक्रमणं अनेकवार परतवून लावली होती. त्याला सरखेल कान्होजी आंग्रे हयांचं कुशल नेतृत्व कारणीभूत होतं. मुख्य भूमी (मेन लॅंड) वरून ते सूत्रं हलवीत असत हे विशेष. १७२९ मध्ये ते मरण पावले. नंतरच्या काळात ही बेटं ब्रिटिशांच्या ताब्यात गेली. इथल्या बेटांचा विकास करण्यासाठी ब्रिटिशांनी आपल्या जगभर पसरलेल्या वसाहतींमधल्या गुन्हेगारांना व अटटल बदमाशांना शिक्षा भोगायला आणलं. त्यातूनच 'काला पानी' हा थरकाप उडवणारा शब्द वापरात येऊ लागला. पुढं १८५७ च्या स्वतंत्रता संग्रामानंतर राजकीय कैदी व क्रांतीकारकांचे जथेच्या जथे हया बेटांवर जन्मठेपेच्या शिक्षेवर येऊ लागले. त्यामुळं बंदिस्त तुरूंगांची आवश्यकता भासू लागली.




सेल्यूलर जेल मधले कैद्यांचे जीवन

१८९६-१९०६ हया दहा वर्षांत कैद्यांकडूनच सेल्यूलर जेल (कोठडी तुरूंग) बांधून घेण्यात आला. १९३६ सालापर्यंत हया वास्तूनं क्रौर्याचे भयावह आविष्कार बघितले. शेकडो बंदिवानांनी अनन्वित अत्याचार मोठया धैर्यानं सोसले. दुसरं महायुद्ध सुरू झालं व काही वर्षं ही बेटं जपान्यांच्या ताब्यात गेली. त्यांनी तर ब्रिटिशांचे हेर समजून निष्पाप नागरिकांचाही अतोनात छळ केला. परिणामी इथल्या स्थानिक रहिवाशांच्या पिढयान पिढया इतक्या भयभीत झाल्या की आजही इथली गुन्हेगारी नगण्य आहे.

स्वतंत्र भारतात ही बेटं समाविष्ट करण्यात आली. पूर्वेकडील हया एकाकी बेटांवर संरक्षण खात्याचा अंमल सुरू झाला. अंदमान बेटांवर नाविक दल तर निकोबार बेटांवर हवाई दलाची ऊभारणी करायला सुरूवात झाली. पर्यटनासाठी हा भाग विकसित होऊ शकेल अशी कुणी कल्पनाही केली नव्हती. अगदी १९८५-९० सालापर्यंत फार कमी पर्यटक येत असत. इथल्या अस्पर्श व निसर्गसौंदर्यानं नटलेल्या असंख्य बेटांच्या प्रेमात पडून काही साहसी मंडळी सर्व अडचणी सोसून येत असत.





जागतिकीकरणानंतर थोडा बदल जाणवू लागला. पण खरी चालना मिळाली ती २००४ च्या त्सुनामी नंतरच. भूकंपाचा केंद्रबिंदू जवळच जावा सुमात्रा बेटांपाशी असल्यानं फार मोठया प्रमाणावर जीवित व वित्त हानी झाली. निकोबार बेटांचं तर अतोनात नुकसान झालं. जगभरातून मदत आली. काही काळानंतर जनजीवन हळूहळू पूर्वपदावर यायला सुरूवातही झाली. तरीपण तिथल्या रहिवाशांच्या मनातली भीती काही केल्या जात नव्हती. त्यासाठी बाहेरून (मुख्य भूमीवरून) मोठया प्रमाणावर भारतीयांनी येऊन त्यांच्याबरोबर राहण्याची व संवाद साधण्याची गरज होती. त्यासाठी पर्यटन व्यवसायाला चालना देण्यात आली. आवश्यक त्या पायाभूत सोयी व सुविधा पुरविण्याकडे खास लक्ष देण्यात आलं. केंद्र सरकारनं आपल्या सर्व कर्मचारी वर्गाला एल. टी. सी. अंतर्गत सर्व कुटुंबाला विमानप्रवासाची सवलत काही काळ उपलब्ध करून दिली. परिणामी २००६ सालापासून इथं खूप मोठया प्रमाणावर प्रवासी येऊ लागले. अगदी कुटुंबासह. त्यामुळं स्थानिकांना रोजगार मिळून त्यांचं राहणीमान सुधारू लागलंच, पण त्यांच्यातला एकटेपणा व भीती कमी झाली. आज २००९ साली अगदी व्यावसायिक रीतीनं इथला पर्यटनाचा व्यवसाय स्थिरावला

आहे. इंटरनेट व मोबाईल फोनच्या माध्यमातून घरबसल्या इथला संपूर्ण कार्यक्रम आपण नीटपणे आखू शकतो. अनेकांनी त्याचा लाभ घेतलेला आहे.




मरीना बीच जेटटी, पोर्ट ब्लेयर

मुंबईला समुद्रकिनारी मरीन लाइन्स परिसर आहे. चेन्नईला मरीना बीच आहे. तर पोर्ट ब्लेयरचा सागर किनाराही मरीना बीच हयाच नावानं ओळखला जातो. त्याच्या परिसरात सुंदर बाग केली असून सुसज्ज स्टेडियम व तरण तलाव आहे. एका बाजूला 'सुनामी' नावाचं स्मृतीशिल्प उभारलं असून चारी बाजूंनी उसळलेल्या लाटांच्या मध्ये पृथ्वीगोल बसवलेला आहे.



मरीना बीच (सुनामी स्मारक)

सुनामी नंतर समुद्राच्या पाण्याची पातळी काही फुटांनी वाढली व काही जेटटी पाण्यात बुडाल्या. पण नव्यानं ऊंच धक्के बांधून बोटींची वाहतूक सुरू करण्यात आली. इथला सगळा परिसर 'राजीव गांधी वॉटर स्पोर्टस कॉम्प्लेक्स' नावानं विकसित करण्यात आला असून प्रवाशांसाठी मोठं आकर्षणकेंद्र बनला आहे. तिथंच राजीवजींचा पुतळा उभारला असून तो दक्षिण मुंबईतल्या कूपरेज उद्यानातल्या पुतळयाचीच आवृत्ती आहे. संथ जलाशयात पायानं चालवायच्या बोटींची तर समुद्रात स्पीड बोटनं वेगात पाण्यावर स्वार व्हायची सोय आहे. छोटया मोठया होडया व यांत्रिक बोटी वापरून दूरवरच्या बेटांवर सफर करून येता येतं. एकूण हा परिसर मुंबईकरांना तरी मरीन लाइन्स ते गिरगाव चौपाटीची आठवण करून देणारा आहे. पंचवीस वर्षांपूर्वी समोर दिसत असलेल्या रॉस आयलंड वर जायला मनाई होती. विशेष परवानगी घ्यावी लागे. आता मात्र हया तीरावरून तिथल्या प्रवेशद्वारावरची 'ROSS' ही मोठी अक्षरं स्पष्टपणे वाचता येतात. नेव्हीच्या देखरेखीखाली तिथं मनसोक्त फिरता येतं.




रॉस आयलंड - आजचं व इतिहासातलं

दूरवरचं 'व्हायपर' बेट (बंदिवान स्त्री पुरूषांना इथं ठेवलं जाई. सेल्यूलर जेल तयार झाल्यावर इथं फक्त स्त्री कैद्यांना ठेवत असत.) व नॉर्थ आयलंड बेट ही खास पाहण्याजोगी. हवामान ठीक असेल व आकाश निरभ्र असेल तर काचेचा तळ बसवलेल्या छोटया बोटीतून समुद्रतळाचं जलचर जीवन व प्रवाळ (कोरल्स) ही पाहता येतात. हया नॉर्थ आयलंड बेटावर पहाडाच्या मध्यावर एक सुरेख दीपगृह आहे. दुरून ते फार सुरेख दिसतं. त्याचं रेखाचित्र वीस रूपयांच्या लाल रंगाच्या

नोटेवर छापलेलं आहे अशी माहिती टुरिस्ट गाईडकडून मिळाली. पोर्ट ब्लेयर चा गजबजलेला ‘अॅबर्डीन बाजार’ व बस स्थानक इथून चालत पाचदहा मिनिटांच्या अंतरावर. आता तिथं खवय्यांकरिता सर्वप्रकारांची व रूचींची उपहारगृहं सेवेला हजर आहेत. इडली डोशापासून ते माशांचे अनेक प्रकार, पंजाबी, चायनीज व अगदी निकोबारी पदार्थ सुद्धा इथं मिळतात. आपापल्या खिशाला परवडतील अशी अनेक निवासस्थानं हया परिसरात विखुरलेली आहेत. इथं मुक्काम करून आजुबाजूची प्रेक्षणीय स्थळं पहायची तर किमान पाच दिवस हवेत. अॅन्थ्रॉपॉलॉजिकल म्युझियम मध्ये हया बेटांचा इतिहास, अंदमानी, ओंगी, जावरा व सेंटिनली जमातींचं जीवन प्रदर्शन रूपात मांडलेलं आहे. चाथम बेटावर लाकूड कापायची मोठी गिरणी आहे. मरीना बीचपाशीच ‘जलजीव’शाला (अॅक्वेरियम) आहे तर बाजूला टेकाडावर प्रसिद्ध सेल्यूलर जेल आहे. बीचपासून आठेक कि. मी. अंतरावर कॉर्बिन्स कोव्ह नावाचा सुरेख समुद्रकिनारा आहे. वंडूरचा समुद्रकिनारा पण अतिशय सुंदर. तिथं जाताना वाटेत अनेक ठिकाणी सुनामीच्या लाटांचे प्रताप पहायला मिळाले. तेव्हां उसळलेलं पाणी खाडीतून वेगानं आत आलं. अनेक घरं व खारफुटीची झुडूपं अजूनही पाण्यात अर्धीअधिक बुडालेली आहेत व तशीच राहणार आहेत.



सुनामीचा परिणाम



वंडूरचा समुद्रकिनारा

वाटेवर मसाल्याच्या पदार्थांची शेती पहायला मिळाली तर रबर लागवडीच्या कामात गेली पन्नास वर्षे काम करणारी संस्था बघितली.

ह्या सहलीची दोन आकर्षणं म्हणजे हॅवलॉक बेटं व बारतांग परिसर. दोन्हीसाठी स्वतंत्र असे पूर्ण दिवस हवेत. हॅवलॉक बेटांवर स्पीड बोटीनं जायला दोन तास लागतात. इथला तीनेक कि. मी. लांबीचा किनारा व निळंशार पाणी 'ब्लू लगून' चित्रपटाची आठवण करून देतं. इथं मुक्काम करायची सवड असेल तर स्कूबा डायविंग करून पाण्याचा तळ पाहता येतो.




हॅवलॉक आयलंड

बारातांग (मायाबंदर) ला जायला मात्र पहाटे साडेतीन वाजता निघावं लागतं. ही बेटं पूर्वेला असल्यानं इथं चार वाजताच उजाडतं. दुपारी चार नंतर अंधार व्हायला सुरूवात होते. तीन तास प्रवास केल्यावर पुढं बोटीतून जावं लागतं. पहाडांमध्ये व जंगलांत आदिम अवस्थेत राहणारी ओंगी जमातीची माणसं दिसतात.




बारातांग (मायाबंदर)

इथं गुहांमध्ये चुनखडीची रंगीबेरंगी नैसर्गिक शिल्पं आहेत. ती अवश्य पहावीत अशीच आहेत. परतीच्या वाटेवर 'मड' (mud) व्होलकॅनो दाखवतात. आता शांत झालेल्या एका खूप प्राचीन ज्वालामुखीतून सतत चिखलाचे बुडबुडे वर येत असतांना पहायला मिळतात.



चुनखडीची शिल्पं




मड व्होलकॅनो

हया बेटांवरचं वन्यजीवनही खूप समृद्ध आहे. पोर्ट ब्लेयरला छोटेखानी पशुपक्षीसंग्रहालय तर आहेच. पण पंचवीसेक कि.मी. अंतरावर 'चिडीया टापू' नावाचा प्रेक्षणीय परिसर पूर्वी पर्यटकांच्या खास आवडीचा होता. सुनामीमध्ये त्या परिसराची वाताहत झाली. आता कुठं हळूहळू तिथलं पक्षीजीवन पूर्वपदावर येऊ लागलंय. इथं बुलबुल पक्षी फार. आमच्या निवासाच्या आसपासही खूपच दिसले.



किंग फिशर



रंगीत खेकडे

१९१० ते २१ हया काळात शिक्षा भोगत असताना सावरकरांना त्यांच्या कोठडीभोवती पुष्कळ बुलबुल बागडतांना दिसत.त्यांच्या मंजुळ सुरांची त्यांना मोठीच सोबत असे. 'मला जर त्यांची भाषा समजली तर मी त्यांना देशभक्तीची गाणी शिकवीन.पुढं ती गाणी ते आपल्या मुलाबाळांना शिकवतील.स्वतंत्र भारताचे नागरिक जेव्हा माझ्या कोठडीला भेट द्यायला येतील तेव्हा हे बुलबुल पक्षी त्यांना देशभक्तीची गाणी ऐकवतील'असं मनाला चटका लावणारं काव्यमय लिखाण सावरकरांनी केलेलं आहे.





सेल्युलर जेलची प्रतिकृती स्मृतीस्तंभ

पोर्ट ब्लेयरच्या राष्ट्रीय स्मारकाला भेट देणं हा अतिशय रोमांचकारी अनुभव. पूर्वी एकदा व हया खेपेला तीनदा स्मारकाचं दर्शन घ्यायला गेलो.सात पाकळयांत मिळून सातशे बंदिवानांची इथं सोय करण्यात आली होती.जपान्यांनी ही बेटं सोडून जाताना तुरूंगाचं खूपच नुकसान करून ठेवलं होतं.सात पैकी तीन पाकळया आज शिल्लक आहेत.जमीनदोस्त झालेल्या भागावर गोविंद वल्लभ पंत हॉस्पिटल उभं आहे.१९४३ मध्ये सुभाषबाबूंनी हया तुरूंगाला भेट दिली त्यावेळी जपान्यांना सोयीच्या चांगल्या बाजू तेवढयाच त्यांना दाखवण्यात आल्या.बाजूच्याच पाकळयांमध्ये स्थानिक निरपराध रहिवाशांना डांबून ठेवून त्यांचा क्रूर छळ होत होता तो त्यांच्यापुढं कधीच आला नाही.अलिकडे स्मारकाच्या दर्शनी भागात पहिल्या मजल्यावर सुभाषबाबूंच्या चित्रमय प्रदर्शनाची मांडणी करण्यात आली आहे.त्यात इथं त्यांना दिलेली सैनिकी मानवंदना, त्यांची काही दिवसांची भेट व इतर छायाचित्रं

सुबकपणं मांडून ठेवण्यात आली आहेत. १९६० च्या सुमारास सेल्यूलर जेलचा उरलेला भागही पाडून टाकायचा प्रस्ताव आला. त्याला अनेकांकडून विरोध झाला. १९६९ साली हा तुरूंग 'राष्ट्रीय स्मारक' म्हणून जतन करायचा निर्णय घेण्यात आला. १९७९ साली पंतप्रधान मोरारजीभाई देसाई हयांच्या हस्ते स्मारकाचं उदघाटन करण्यात आलं. १९८५ साली तुरूंगाच्या आतल्या भागात एक स्मृतीस्तंभ राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग हयांच्या हस्ते ऊभारण्यात आला. आता मात्र सेल्यूलर जेलचं स्मारक सन्मानपूर्वक जपलं आहे.





सेल्युलर जेल - राष्ट्रीय स्मारक व स्वतंत्रता ज्योती

अलिकडं रोज सायंकाळी ध्वनिप्रकाशाच्या खेळाचं (लाइट अँड साऊंड शो) अत्यंत नेटकं सादरीकरण केलं जातं. त्यामुळं इथला इतिहास नीट समजतो. त्यात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हयांचा उल्लेख गौरवानं होतो. 'जयोस्तुते श्री महन्मंगले' हे स्वतंत्रतादेवीचं गीत हया वास्तूत ऐकविलं जातं तेव्हां मन भरून येतं. १८५७ च्या उठावानंतर सशस्त्र क्रांतीकारकांची एक लाटच देशभर आली. त्यातले शेकडो बंदिवान इथं शिक्षा भोगायला आले. मात्र माणूस म्हणून आपले मूलभूत हक्क मिळवण्याकरिता त्यांना भूक हरताळ, असहकार, निवेदनं, अर्ज व विनंत्या हीच आधुनिक काळातली हत्यारं (साधनं) वापरावी लागली. त्याची माहिती हया सादरीकरणातून मिळते.

इथल्या तुरूंगात शहीद झालेल्या सहा क्रांतिकारकांचे पुतळे मुख्य प्रवेशद्वाराबाहेर व रस्त्यासमोरच्या जागेत १९९७ मध्ये उभारण्यात आले. हातापायात बेडया घातलेल्या हया वीर पुरूषांच्या चरित्र व कर्तृत्वाची माहिती तिथल्या शिलालेखांवर कोरलेली आहे. 'शहीद बाग' म्हणूनच ती आजही ओळखली जाते. पुढं तिचं नामकरण 'वीर



सावरकरांची कोठडी व तैलचित्र

सावरकर राष्ट्रीय स्मारक' असं करण्यात आलं व एका कोप-यात त्यांचा धोतर, कोट, टोपी घातलेला व हातात छत्री घेतलेला (हिंदू महासभेचे अध्यक्ष असतानच्या काळातला) पुतळा बसविण्यात आला. त्यावर 'हा पुतळा शहीद बागेत कसा ? ते तर इथं शहीद झाले नव्हते' अशी टीकाही बंगाली क्रांतीकारकांच्या वारसांकडून झाली. हया पुतळयाशेजारच्या शिलालेखाप्रमाणे तात्याराव सावरकरांच्या जन्मशताब्दीनिमित्तानं १९८३ साली मुंबईहून हा पुतळा इथं भेट म्हणून पाठविण्यात आला होता. त्याची इथं स्थापना करण्यात आली. १९९४ साली पारल्याच्या सुनील महाजन हयांनी तयार केलेलं तैलचित्र सावरकरांना ज्या कोठडीत ठेवलं होतं तिथल्या भिंतीवर लावण्यात आलं. त्यात कैद्याच्या पोशाखात साखळदंडांनी जखडलेले सावरकर दिसतात. डाव्या बाजूला वर 'कमला' काव्याच्या ओळी लिहिलेल्या आहेत. आज त्या चित्रावर तामिळ व बंगाली भाषेत कोठडीला भेट देऊन गेलेल्यांनी 'संदेश' लिहून ठेवलेले आहेत. ते पाहून मनाला क्लेश झाले. पण संबंधितांकडे तक्रार व निषेध नोंदवण्यापलिकडं काही करू शकलो नाही. असं चित्र वा नावाचा उल्लेख असलेली पाटी आणखी कोणत्याही कोठडीत आढळली नाही. २००४ साली तुरूंगाच्या प्रवेशद्वारापाशी अखंड तेवणारी स्वतंत्रता ज्योत ऊभारण्यात आली. तिच्या चबुत-यावर कोरलेल्या सावरकरांच्या काव्यपंक्ती काढायला लावल्यावरून महाराष्ट्रात मोठाच गदारोळ झाला. त्याला जबाबदार मंत्री मणीशंकर अय्यर हयांच्या बुजगावण्याला जोडे मारायचा कार्यक्रमही शिवाजी उद्यानात झाला. आजही त्या ओळी गायबच आहेत. इथल्या विमानतळावरही त्यांची माहिती लिहिलेला एकमात्र फलक एका खांबावर वाचता येऊ नये इतक्या ऊंचीवर

लावलेला आहे. एकूणात त्यांच्या नशीबातली उपेक्षा व अवहेलना अजूनही होती तशीच कायम आहे. १९६९ पासून बराच काळ इथले तुरूंगप्रमुख (जेलर) श्री. गोविंदराव हर्षे होते. गावातल्या त्यांच्या घरात त्यांनी सावरकर बंधूंचं स्मृतीमंदिर ऊभारलं होतं. आपल्या वास्तूत 'महाराष्ट्र मंडळ' ही स्थापन केलं होतं. मागच्या खेपेला त्यांना भेटलो होतो. हया खेपेलाही जाऊन आलो. आता त्यांना जाऊनही बरीच वर्षे झाली. वास्तूची रया पार गेली आहे. साडया गालीचांचा सेल लागलेला आहे. पलिकडच्याच चौकात 'कन्नड भवना' ची देखणी इमारत उभी आहे. रामक्रिष्ण मिशन व विवेकानंद केंद्रांचं काम त्यांच्या सुबक इमारतींमध्ये चालू आहे. ते वाढतच जाणार आहे. आपण मात्र इतिहासात रमण्यातच धन्यता मानू या व राजकारणच करत राहू या.

मरीना बीचवर सुभाषचंद्र बोस हयांचा सैनिकी पोशाखातला 'चलो दिल्ली' थाटातला पुतळा आहे. मुख्य भूमीकडं पाठ करून ते उभे आहेत. सावरकरांचा पुतळा सेल्युलर जेलच्या बाहेर व मुख्य भूमीकडं तोंड करून आहे. हे दोन वीरपुरूष इथं येऊन तरी गेले. पण हयांच्याशी राजकीय व वैचारिक मतभेद असलेल्या व हया भूमीवर कधीच न आलेल्या गांधीजींचे मात्र दोन पुतळे इथं आहेत. एम. जी. (महात्मा गांधी) रोडवरचा बस स्टॅंडसमोरचा 'दांडी यात्रा' पोझ मधला एक पुतळा 'आम आदमी'त मिसळून गेलेला आहे तर दुसरा मुलांच्या 'गांधी' बागेत असून बाकावर बसून पुस्तक वाचतो आहे. भारताचे हे तीन्ही सुपुत्र इथल्या रहिवाश्यांना व प्रवाश्यांना सदैव स्फूर्ती देत राहतील.



सेल्युलर जेलसमोरचा सावरकरांचा पुतळा



गांधी बागेतला पुतळा

समुद्रकिनारे भारतीयांना नवीन नाहीत. गोवा, केरळ, कोंकण त्याकरिता विख्यात आहेतच. पण अंदमान निकोबार बेटांचे किनारे, तिथलं जन, वन्य व जलजीवन हे विषेश व अनोखं आहे. त्याचा आस्वाद प्रत्यक्ष जाऊनच घ्यायला हवा. 'काळया पाण्या'चं अंतरंग व बदलते रंग इथं येऊनच बघायला हवेत. आज ज्यांच्या असीम त्यागामुळं आपण स्वातंत्रयाचा मनमोकळा श्वास घेत आहोत त्या क्रांतीकारकांच्या पवित्र स्मृतीला अभिवादन करून नतमस्तक होण्याकरिता एकदा तरी प्रत्येकानं इथं यायलाच हवं. दिवाळीची किंवा ऊन्हाळयाची सुटटी त्यासाठी ऊत्तम.
काय मग, निघताय ना?

डॉ. सुरेश चांदवणकर
chandvankar@yahoo.com
१४ जून २००९



